नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 15/01/2021 (शुक्रवार)
(दुपार)

---

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीतानां अटक
## पो. स्टे. मौदाची कार्यवाही

सविनय सादर आहे किए पोलीस स्टेशन मौदा येथे दि. 14/01/2021 रोजी ग्रामपंचायत निवडणुक सबंधाने पोलीस स्टॉप पो.उपनी. अरविंद मोहोड, पो.हवा. प्रशांत काळे, पो.कॉ. रवि वानखेडे, पो.कॉ. प्रफुल रंधई, पो.कॉ. प्रविण जावरकर, पो.कॉ. केशव फड हे मौजा महालगाव बिटपरिसरात नाकाबंदी करित असतांना त्यांना ट्रॅंक क्र. MH-36-AA-0762 व ट्रॅंक क्र. MH-36-AA-1346 हे भंडारा कडुन नागपुरकडे जातांना दिसले. त्याच्यावर संशय आल्याने दोन्ही ट्रॅंक थांबवुन ट्रॅंक ड्रायव्हर यास ट्रॅंकमधील मालाबाबत विचारपुस केली असता त्यामध्ये रेती असल्याचे सांगितले. त्यांना सदर रेती बाबत रॉयल्टी मागितली असता त्यांनी खनीज साधन विभाग मध्यप्रदेश शासन वाहतुक परवाना ETP रेती घाट कडमसरा ता. जयथरी जिल्हा अन्नपुर (मध्यप्रदेश) येथील रॉयल्टी दाखविली. दाखविलेल्या रॉयल्टीवर संशय आल्याने माथनी टोल येथे संपर्क साधुन विचारपुस केली असता दोन्ही ट्रॅंक हे एकाच रांयल्टीवर दोनदा रेती घेऊन जातांना CCTV फोटेजमध्ये दिसुन आले. नमुद दोन्ही ट्रॅंक व चालक नामे 1) मिलींद सुदाम सुखदेवे वय 35 वर्ष रा. पलाडी पो. आमगाव (दिघोरी) ता.जि. भंडारा 2) कैलास खुशाल भोंदे वय 31 वर्ष रा. आंबाडी ता.जि. भंडारा व ट्रॅंक मालक नामे मनोज हरिदास मेश्राम रा. भुयार ता. जि. भंडारा यांना ताब्यात घेण्यात आले. यातील ट्रॅंक चालक व माल यांच्यावर अप क्र. 15,16/2021 कलम 379, 109 भा.द.वी. प्रमाने वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले. दोन्ही गुन्ह्यातील ट्रॅंक क्र. MH-36-AA-0762 व ट्रॅंक क्र. MH-36-AA-1346 कि. 40,00,000/- रुपये व दोन्ही ट्रॅंकमधील 8 ब्रॉस रेती कि. 32,000/- असा एकुण 40,32,000/- रुपयाचा माल जप्त करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याची कार्यवाही मा. श्री. राकेश ओला पोलीस अधिक्षक श्री. राहुल माकनिकर अप्पर पोलीस अधिक्षक, श्री. राजेंन्द्र चव्हाण उपविभागिय पोलीस अधिकारी प्रभारी चॉर्ज कामठी यांचे मार्गदर्शनाखाली श्री. हेमंतकुमार खराबे वरीष्ठ पोलीस निरीक्षक, पो.उपनिरीक्षक अरविंद मोहोड पो.हवा. प्रशांत काळे, पो.कॉ. रवि वानखेडे, पो.कॉ. प्रफुल रंधई, पो.कॉ. प्रविण जावरकर, पो.कॉ. केशव फड हे करित आहेत.



## अपघातात मृत्यू

पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 7 कि.मि. मौजा रिंगणाबोडी शिवार दशमेश ढाब्या समोर एनएच–53 रोडवर दिनांक 14/01/2021 चे 00:05 वा. दरम्यान एमएच– 40/एएफ– 0440 क्रमांकाच्या मोटरसायकलचा चालक/जखमी नामे– भरत ठाकरे, रा. शेखापूर हा त्याची मैत्रीन योगीता रासेगावकर, वय 24 वर्ष, रा. शिवा हिला डबल सिट बसवून कोंढाळी वरून नागपूर कडे जात असतांना दशमेश हॉटेलच्या समोर हायवे रोडवर अज्ञात चार चाकी आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळीजीपणे चालवुन वरील मोटरसायकला कट मारून अपघात करून पळून गेला. या अपघातात योगीता रासेगावकर हि डांबरी रोडवर पडल्याने तीच्या डोक्याला गंभीर मार लागल्याने ती मरण पावली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रमन अर्जुनराव परतेती, वय 30 वर्ष, रा. दुधाळा ता. काटोल जि. नागपूर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनिय ढगे मो.न. 9518979499 हे करीत आहे.

## अवैधरीत्या धारदार व घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 3 कि.मी. अंतरावर चनकापुर येथे दिनांक 13/01/2021 चे 16.00 वा. ते 16.30 वा. दरम्यान आरोपी नामे– शैलेश सुरेश मसराम, वय 35 वर्ष, रा. वार्ड क्र. 4, दहेगाव रंगारी याने तो मौका या गुन्हयामध्ये कारागृहात बंद असलेला नामे– सुरज कावळे याचे सहकारी असल्याची फिर्यादी नामे– फिरोज मुस्ताक सिदद्ीकी वय 35 वर्ष रा. वार्ड क 4 दहेगांव रंगारी याला भिती दाखवुन त्याचे दुकानातुन 2,100/– रू चे कपड खरेदी करून त्याचे बिल न देता निघुन तो गेला. त्यावरून फिर्यादीने घटनेसंबधाने पो. स्टे. खापरखेडा येथे तक्रार दिल्याने आरोपी कडुन तो घेवून गेलेले कपडे कि. 2100/–रू. व चाकु अश्या प्रकारचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 384 भादवी सहकलम 4, 25 भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमुद आरोपीस अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोहवा गुरूप्रकाश मेश्राम 9823453169 हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत 15 कि. मी. अंतरावर मौजा मसोरा येथे दिनांक 14/01/2021 चे 10:00 वा. ते 15.00 वा. पुर्वी भाउरावजी राजेराम दोडके(मृतक), वय 85 वर्ष, रा. मसोरा याने वजन जास्त असल्याने त्याला कोणत्यातरी सहायविना उठने बसने होत नसल्याने त्याने नैराश्य होवुन त्याचे राहते घराचे अंगणात जांभीचे झाडाला त्याचेच उठण्याकरीता बांधलेल्या दोराला गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सुरेश भाउरावजी दोडके वय 45 वर्ष रा.मसोरा यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. नरखेड येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार धनराज भुक्ते 9823612858 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर